श्रीमद् भागवत का यह सार
भगवद् भक्ति ही आधार

# श्रीमद्भागवत रसिक कुटुंब

## ऋषभ गीता प्रथम अध्याय(भा°म°5.1)



भरत सहित शत पुत्रों को जो दिया दिव्य उपदेश।
ऋषभदेव ने मार्ग दिखाकर गीता कही विशेष

**नारायणं(न्) नमस्कृत्य, नरं(ञ्) चैव नरोत्तमम्।**
**देवीं(म्) सरस्वतीं(वँ) व्यासं(न्), ततो जयमुदीरयेत्**

**नामसङ्कीर्तनं(यँ) यस्य, सर्वपापप्रणाशनम्।**
**प्रणामो दुःखशमनस्, तं(न्) नमामि हरिं(म्) परम्**

**श्रीमद्भागवतमहापुराणम्**

**पञ्चमः स्कन्धः**

**॥ प्रथमोऽध्यायः॥**

**राजोवाच**

**प्रियव्रतो भागवत, आत्मारामः(ख्) कथं(म्) मुने ।**
**गृहेऽरमत यन्मूलः(ख्), कर्मबन्धः(फ्) पराभवः ॥ 1॥**

परीक्षिताने विचारले – मुनिवर्य, महाराज प्रियव्रत भगवद्भक्त असून आत्माराम होता. ज्यात गुंतल्यामुळे मनुष्याला आपल्या स्वरूपाची विस्मृती होते आणि तो कर्मबंधनाने बांधला जातो, त्या गृहस्थाश्रमात तो कसा रमला? (१)

**न नूनं(म्) मुक्तसङ्गानां(न्), तादृशानां(न्) द्विजर्षभ ।**
**गृहेष्वभिनिवेशोऽयं(म्), पुं(म्)सां(म्) भवितुमर्हति ॥ 2॥**

हे विश्ववर, अशा निःसंग महापुरुषांचा गृहस्थाश्रमाविषयी असा आग्रह असणे मुळीच योग्य वाटत नाही. (२)

**महतां(ङ्) खलु विप्रर्षे, उत्तमश्लोकपादयोः ।**

**छायानिर्वृतचित्तानां(न्), न कुटुम्बे स्पृहामतिः ॥ 3॥**

हे विश्वश्रेष्ठ, ज्यांचे चित्त पुण्यकीर्ती श्रीहरींच्या चरणांच्या शीतल छायेच्या आश्रयामुळे शांत झाले आहे, अशा महापुरुषांची कुटुंबाविषयी खरे म्हणजे आसक्ती असत नाही. (३)

**सं(म्)शयोऽयं(म्) महान्, ब्रह्मन्दारागारसुतादिषु ।**

**सक्तस्य यत्सिद्धिरभूत्- कृष्णे च मतिरच्युता ॥ 4॥**

ब्रह्मन्, महाराज प्रियव्रताने स्त्री, घर आणि पुत्र इत्यादींमध्ये आसक्त राहूनसुद्धा कोणत्या प्रकारे सिद्धी प्राप्त करून घेतली आणि कशामुळे त्याची भगवान श्रीकृष्णामध्ये अविचल भक्ती निर्माण झाली, याविषयी मला मोठा संशय आहे. (४)

**श्रीशुक उवाच**

**बाढमुक्तं(म्) भगवत उत्तमश्लोकस्य श्रीमच्चरणारविन्दमकरन्दरस**

**आवेशितचेतसो, भागवतपरमहं(म्)सदयितकथां(ङ्)**

**किञ्चिदन्तरायविहतां(म्) स्वां(म्) शिवतमां(म्)**

**पदवीं(न्) न प्रायेण हिन्वन्ति ॥ 5॥**

श्रीशुकाचार्य म्हणाले – राजन्, तुझे म्हणणे अगदी योग्य आहे. ज्यांचे चित्त पवित्रकीर्ती श्रीहरींच्या चरणकमल-मकरंदाच्या रसामध्ये डुंबत असते, ते कोणत्याही विघ्नामुळे अडथळा आला तरी भगवद्भक्त परममहंसांना प्रिय भगवंतांचा कथाश्रवणरूपी कल्याणमय मार्ग सहसा सोडीत नाहीत. (५)

**यर्हि वाव ह राजन् स राजपुत्रः(फ्) प्रियव्रतः(फ्)**

**परमभागवतो नारदस्य चरणोपसेवयाञ्जसावगतपरमार्थसतत्त्वो,**

**ब्रह्मसत्रेण दीक्षिष्यमाणोऽवनितलपरिपालनायाम्नातप्रवरगुणगणैकान्तभाजनतया,**

**स्वपित्रोपामन्त्रितो भगवति वासुदेव एवाव्यवधानसमाधियोगेन**

**समावेशितसकलकारकक्रियाकलापो,**

**नैवाभ्यनन्दद्यद्यपि तदप्रत्याम्नातव्यं(न्) तदधिकरण**

**आत्मनोऽन्यस्मादसतोऽपि पराभवमन्वीक्षमाणः ॥ 6॥**

राजन्, राजकुमार प्रियव्रत मोठा भगवद्भक्त होता. श्रीनारदांच्या चरणांची सेवा केल्यामुळे त्याला सहजच परमार्थतत्त्वाचा बोध आला होता. तो ब्रह्मज्ञानाची दीक्षा घेणार होता, परंतु त्याचे वडील स्वायंभुव मनूनी पृथ्वीपालन करण्यासाठी शास्त्रात सांगितलेल्या सर्व श्रेष्ठ गुणांनी तो संपन्न आहे, असे पाहून त्याला राज्य चालवण्याची आज्ञा केली. परंतु प्रियव्रताने अरुणक वास करण्यासाठी आपल्या इंद्रिये आणि क्रिया भगवान वासुदेवांच्या चरणी समर्पण केल्या होत्या. जरी पित्याच्या आज्ञेचे उल्लंघन करणे शक्य नव्हते, तरी राज्य करताना आपले आत्मस्वरूप विसरून प्रपंचामध्ये आच्छादित होऊन जाईल, या विचाराने राज्य स्वीकारण्यात त्याला रस वाटला नाही. (6)

अथ ह भगवानादिदेव एतस्य गुणविसर्गस्य

परिबृं(म्)हणानुध्यानव्यवसितसकलजगदभिप्राय,

आत्मयोनिरखिलनिगमनिजगणपरिवेष्टितः(स्)

स्वभवनादवततार ॥ 7॥

तेव्हा मनात नेहमी या गुणमय प्रपंचाच्या बाबतीत विचार करणारे आणि त्यामुळेच सर्व जगाचे मनोगत जाणणारे आदिदेव स्वयंभू भगवान ब्रह्मदेव चारी वेद आणि मरीच इत्यादी आपल्या पार्षदांना बरोबर घेऊन सत्यलोकातून खाली उतरले. (7)

स तत्र तत्र गगनतल उडुपतिरिव

विमानावलिभिरनुपथममरपरिवृढैरभिपूज्यमानः(फ्),

पथि पथि च वरूथशः(स्) सिद्धगन्धर्वसाध्यचारणमुनिगणैरुपगीयमानो

गन्धमादनद्रोणीमवभासयन्नुपससर्प ॥ 8॥

आकाशात ठिकठिकाणी विमानांत बसलेले मुख्य देव त्यांचे पूजन करीत होते. तसेच सिद्ध, गंधर्व, साध्य, चारण आणि मुनिजन यांचे समूह त्यांची स्तुती करीत होते. अशा प्रकारे ठिकठिकाणी आदरसत्कार स्वीकारून, ते चंद्राप्रमाणे गंधमादन पर्वताची शिखरे प्रकाशित करीत प्रियव्रताजवळ येऊन पोहोचले. (8 )

तत्र ह वा एनं(न्) देवर्षिर्हं(म्)सयानेन पितरं(म्) भगवन्तं(म्)

हिरण्यगर्भमुपलभमानः(स्), सहसैवोत्थायार्हणेन सह

पितापुत्राभ्यामवहिताञ्जलिरुपतस्थे ॥ 9॥

हंस हे वाहन पाहून देवर्षी नारद आपले पिता ब्रह्मदेव आलेले आहेत, हे जाणून स्वायंभुव मनू आणि प्रियव्रतासह ताबडतोब उठून उभे राहिले आणि त्या सर्वांनी हात जोडून त्यांना नमस्कार केला. (9)

भगवानपि भारत तदुपनीतार्हणः(स्)

सूक्तवाकेनातितरामुदितगुणगणावतारसुजयः(फ्),

प्रियव्रतमादिपुरुषस्तं(म्) सदयहासावलोक इति होवाच ॥ 10॥

हे परीक्षिता, नारदांनी त्यांची पूजा केली आणि गोड शब्दांनी त्यांचे गुण, अवतार आणि मोठमोठे विजय यांचे वर्णन केले. तेव्हा आदिपुरुष भगवान ब्रह्मदेवांनी प्रियव्रताकडे मंद हास्ययुक्त दयार्द्र दृष्टीने पाहिले व म्हटले— (10 )

श्रीभगवानुवाच

निबोध तातेदमृतं(म्) ब्रवीमि,

मासूयितुं(न्) देवमर्हस्यप्रमेयम् ।

वयं(म्) भवस्ते तत एष महर्षिर्-

वहाम सर्वे विवशा यस्य दिष्टम् ॥ 11॥

श्रीब्रह्मदेव म्हणाले—पुत्रा, मी तुला सत्य सांगतो, तो ऐक. अनाकलनीय लीला करणाऱ्या श्रीहरीच्या बाबतीत तू कोणत्याही प्रकारे दोषदृष्टीने पाहू नकोस. महादेव, तुझे पिता स्वायंभुव मनू आणि तुझे गुरू नारदसुद्धा त्यांच्या अधीन राहून त्यांच्याच आज्ञेचे पालन करतात. ( 11 )

**न तस्य कश्चित्तपसा विद्यया वा,**

**न योगवीर्येण मनीषया वा।**

**नैवार्थधर्मैः(फ्) परतः(स्) स्वतो वा,**

**कृतं(वँ) विहन्तुं(न्) तनुभृद्विभूयात् ॥ 12॥**

त्यांची इच्छा कोणीही देहधारी तप, विद्या, योगबल, बुद्धिबल, अर्थशक्ती, धर्मशक्ती यांच्या जोरावर स्वतः किंवा कोण्या दुसऱ्याच्या साहाय्याने टाळू शकत नाही. ( 12 )

**भवाय नाशाय च कर्म कर्तुं(म्),**

**शोकाय मोहाय सदा भयाय ।**

**सुखाय दुःखाय च देहयोग-**

**मव्यक्तदिष्टं(ञ्) जनताङ्ग धत्ते ॥ 13॥**

सर्व जीवांना त्याच अभ्यक्त ईश्वराने दिलेले शरीर जन्म, मरण, शोक, मोह, भय आणि सुख-दुःखांचा भोग घेण्यासाठी तसेच कर्म करण्यासाठी नेहमी धारण करावे लागते. (१३)

**यद्वाचि तन्त्यां(ङ्) गुणकर्मदामभिः(स्),**

**सुदुस्तरैर्वत्स वयं(म्) सुयोजिताः।**

**सर्वे वहामो बलिमीश्वराय,**

**प्रोता नसीव द्विपदे चतुष्पदः ॥ 14॥**

वस्त्रा, ज्याप्रमाणे नाकात वेषण घातलेला पशू मनुष्यांनी लादलेले ओझे वाहतो, त्याचप्रमाणे परमात्म्याच्या वेदवाणीरूप दोरीने गुण व कर्मे यात जखडलेले आम्ही सर्वजण त्यांच्या इच्छेनुसार कर्मांनी त्यांची पूजा करीत राहतो. (१४)

**ईशाभिसृष्टं(म्) ह्यवरुन्ध्महेऽङ्ग,**

**दुःखं(म्) सुखं(वँ) वा गुणकर्मसङ्गात् ।**

**आस्थाय तत्तद्यदयुङ्क्त नाथश्-**

**चक्षुष्मतान्धा इव नीयमानाः ॥ 15॥**

आमचे गुण आणि कर्म यानुसार प्रभुनी आम्हाला ज्या योनीमध्ये जन्माला घातले आहे, तिचा स्वीकार करून ते जसे आम्हाला ठेवतील, त्यानुसार आम्ही सुख किंवा दुःख भोगीत राहतो. जसे एखाद्या आंधळ्याला डोळसाचे अनुकरण करावे लागते, तसे आम्हांला त्यांच्या इच्छेनुसार करावे लागते. (१५)।

मुक्तोऽपि तावद्बिभृयात्स्वदेह-

मारब्धमश्नन्नभिमानशून्यः ।

यथानुभूतं(म्) प्रतियातनिद्रः(ख्),

किं(न्) त्वन्यदेहाय गुणान्न वृङ्क्ते ॥ 16॥

जसे मनुष्याला जाग आल्याबरोबर त्याला स्वप्नात अनुभवलेल्या पदार्थांचे स्मरण होते, तसेच मुक्त पुरुषसुद्धा प्रारब्धाचा भोग भोगीत भगवंतांच्या इच्छेनुसार आपले शरीर धारण करतोच. पण या अवस्थेत मीपण नसल्यामुळे विषयवासनेच्या ज्या संस्कारामुळे दुसरा जन्म होतो, तो जन्म त्याला येत नाही. (१६)

भयं(म्) प्रमत्तस्य वनेष्वपि स्याद्,

यतः(स्) स आस्ते सहषट्सपत्नः।

जितेन्द्रियस्यात्मरतेर्बुधस्य,

गृहाश्रमः(ख्) किं(न्) नु करोत्यवद्यम् ॥ 17॥

जो पुरुष इंद्रियांच्या अधीन असतो, तो जंगलातून भ्रमण करीत राहिला, तरी त्याला जन्म-मरणाचे भय असते. कारण न जिंकलेले मन आणि इंद्रियरूपी सहा शत्रू त्याचा पिच्छा सोडीत नाहीत. जो बुद्धिमान पुरुष इंद्रियांना जिंकून आपल्या आत्म्यातच रमण होतो, त्याचा गृहस्थाश्रमसुद्धा त्याचे काहीही बिघडवू शकत नाही. (१७)

यः(ष्) षट् सपत्नान् विजिगीषमाणो,

गृहेषु निर्विश्य यतेत पूर्वम् ।

अत्येति दुर्गाश्रित ऊर्जितारीन्,

क्षीणेषु कामं(वँ) विचरेद्विपश्चित् ॥ 18॥

ज्याला या सहा शत्रूंना जिंकण्याची इच्छा असेल, त्याने अगोदर घरात राहून त्यांना वश करण्याचा प्रयत्न करावा. किल्ल्यात सुरक्षित राहून युद्ध करणारा राजा, आपल्या प्रबळ शत्रूंना जिंकतो आणि जेव्हा या शत्रूंचे सामर्थ्य अत्यंत क्षीण होते, तेव्हा तो शहाणा राजा स्वतःच्या इच्छेनुसार वागू शकतो. (१८)

त्वं(न्) त्वब्जनाभाङ्घ्रिसरोजकोश-

दुर्गाश्रितो निर्जितषट्सपत्नः ।

भुङ्क्ष्वेह भोगान् पुरुषातिदिष्टान्,

विमुक्तसङ्गः(फ्) प्रकृतिं(म्) भजस्व ॥ 19॥

श्रीभगवंतांच्या चरणकमलांच्या कळ्यारूपी किल्ल्यात राहून जरी तू या सहा शत्रूंना जिंकले आहेस, तरीसुद्धा प्रथम त्या पुराणपुरुषाने दिलेल्या भोगांचा उपभोग घे आणि नंतर निःसंग होऊन आपल्या आत्मस्वरूपात स्थिर हो. (१९)

**श्रीशुक उवाच**

**इति समभिहितो महाभागवतो भगवतस्त्रिभुवनगुरोरनुशासनमात्मनो,**

**लघुतयावनतशिरोधरो बाढमिति सबहुमानमुवाह ॥ 20॥**

श्रीशुकाचार्य म्हणतात- ब्रह्मलोकाचे गुरु श्रीबृहस्पती जेव्हा असे म्हणाले, तेव्हा स्वतःचे लहानपण लक्षात घेऊन परमभगवत् प्रियत्वाने नम्रपणे मस्तक झुकवले. आणि “जशी आज्ञा” असे म्हणून मोठ्या आदराने त्यांची आज्ञा शिरसावंद्य मानली. (२०)

**भगवानपि मनुना यथावदुपकल्पितापचितिः(फ्)**

**प्रियव्रतनारदयोरविषममभिसमीक्षमाणयोरात्मसमवस्थानमवाङ्मनसं(ङ्)**

**क्षयमव्यवहृतं(म्) प्रवर्तयन्नगमत् ॥ 21॥**

तेव्हा स्वायंभुव मनूंनी प्रसन्न मनाने भगवान् बृहस्पतींची शास्त्रोक्त पूजा केली. नंतर ब्रह्मदेव मन आणि वाणीचा विषय नसलेल्या, आपला आश्रय आणि सर्व व्यवहारांच्या पलीकडील अशा परब्रह्माचे चिंतन करीत आपल्या लोकी गेले. त्यामुळे प्रियव्रत आणि नारद सरल मनाने त्यांचेकडे पाहात राहिले होते. (२१)

**मनुरपि परेणैवं(म्) प्रतिसन्धितमनोरथः(स्)**

**सुरर्षिवरानुमतेनात्मजमखिलधरामण्डलस्थितिगुप्तय,**

**आस्थाप्य स्वयमतिविषमविषयविषजलाशयाशाया उपरराम ॥ 22॥**

ब्रह्मदेवांच्या कृपेने अशा रीतीने आपले मनोरथ पूर्ण झाल्यानंतर मनूंनी देवर्षी नारदांच्या आज्ञेनुसार संपूर्ण पृथ्वीच्या रक्षणाचा भार प्रियव्रतावर सोपविला आणि ते विषयस्वरूपी विषारी जळाने भरलेल्या गृहस्थाश्रमरूपी दुसऱ्या जलाशयातील भोवऱ्यांपासून परावृत्त झाले. (२२)

**इति ह वाव स**

**जगतीपतिरीश्वरेच्छयाधिनिवेशितकर्माधिकारोऽखिलजगद्बन्धध्वं(म्)सनपरानुभावस्य,**

**भगवत आदिपुरुषस्याङ्घ्रियुगलानवरतध्यानानुभावेन**

**परिरन्धितकषायाशयोऽवदातोऽपि मानवर्धनो**

**महतां(म्) महीतलमनुशशास ॥ 23॥**

भगवंताच्या इच्छेने आता पृथ्वीपती महाराज प्रियव्रत राज्य करू लागला. जे संपूर्ण जगाला बंधनातून सोडविण्यास समर्थ आहेत, त्या आदिपुरुष भगवंतांच्या चरणयुगुलांचे निरंतर ध्यान करीत राहिल्याने जरी त्याचे रागद्वेषादी सर्व मल नष्ट झाले होते आणि हृदय अत्यंत शुद्ध झाले होते, तरीसुद्धा ज्येष्ठांचा मान राखण्यासाठी तो पृथ्वीचे राज्य करू लागला. (२३)

**अथ च दुहितरं(म्) प्रजापतेर्विश्वकर्मण उपयेमे बर्हिष्मतीं(न्)**

**नाम तस्यामु ह वाव, आत्मजानात्मसमानशीलगुणकर्मरूपवीर्योदारान्दश**

**भावयाम्बभूव कन्यां(ञ्) च यवीयसीमूर्जस्वतीं(न्) नाम ॥ 24॥**

त्यानंतर त्याने विश्वकर्मा प्रजापतीची कन्या बहिर्ष्मतीशी विवाह केला. तिच्यापासून त्याला दहा पुत्र झाले. ते सर्वजण त्याच्याप्रमाणे शीलवान, गुणी, कर्मनिष्ठ, रूपवान आणि पराक्रमी होते. त्याला सर्वांत लहान ऊर्जस्वती नावाची एक कन्याही झाली. (२४)

**आग्नीध्रेध्मजिह्वयज्ञबाहुमहावीरहिरण्यरेतोघृतपृष्ठसवनमेधातिथिवीतिहोत्रकवय**

**इति सर्व एवाग्निनामानः ॥ 25॥**

अग्नीध्र, इध्मजिह्व, यज्ञबाहू, महावीर, हिरण्यरेता, घृतपृष्ठ, सवन, मेधातिथी, वीतिहोत्र, आणि कवी अशी त्या पुत्रांची नावे होती. ही सर्व नावे अग्नीची आहेत. (२५)

**एतेषां(ङ्) कविर्महावीरः(स्) सवन इति त्रय आसन्नूर्ध्वरेतसस्त,**

**आत्मविद्यायामर्भभावादारभ्य कृतपरिचयाः(फ्) पारमहं(म्)स्यमेवाश्रममभजन् ॥ 26॥**

त्यांपैकी कवी, महावीर आणि सवन हे तिघे नैष्ठिक ब्रह्मचारी झाले. लहानपणापासूनच आत्मविद्येचा अभ्यास करीत त्यांनी शेवटी संन्यासाश्रम स्वीकारला. (२६)

**तस्मिन्नु ह वा उपशमशीलाः(फ्) परमर्षयः(स्) सकलजीवनिकायावासस्य**

**भगवतो, वासुदेवस्य भीतानां(म्) शरणभूतस्य**

**श्रीमच्चरणारविन्दाविरतस्मरणाविगलितपरमभक्तियोगानुभावेन,**

**परिभावितान्तर्हृदयाधिगते भगवति सर्वेषां(म्) भूतानामात्मभूते**

**प्रत्यगात्मन्येवात्मनस्तादात्म्यमविशेषेण समीयुः ॥ 27॥**

या निवृत्तीपरायण महर्षींनी संन्यासा श्रमात राहून सुद्धा सर्व जीवांचे अधिष्ठान आणि संसार बंधनाला भ्यालेल्या लोकांना आश्रय देणाऱ्या भगवान वासुदेवांच्या चरणार विंदांचे निरंतर चिंतन केले .त्यामुळे प्राप्त झालेल्या अखंड आणि श्रेष्ठ भक्ती योगामुळे त्यांचे अंतकरण पूर्ण शुद्ध झाले व त्यात श्री भगवंतांचा अविर्भाव झाला .तेव्हा देहा दी उपाधींची निवृत्ती झाल्याने त्यांचा आत्मा सर्व जीवांच्या आत्मभूत अंतरातल्यामध्ये एकरूप झाला .

**अन्यस्यामपि जायायां(न्) त्रयः(फ्) पुत्रा आसन्नुत्तमस्तामसो**

**रैवत इति मन्वन्तराधिपतयः ॥ 28॥**

प्रिय भ्रताच्या दुसऱ्या पत्नीलाही उत्तम ,तामस आणि रैवत असे तीन पुत्र झाले .ते आपापल्या नावांच्या मनवंतरांचे अधिपती झाले.

**एवमुपशमायनेषु स्वतनयेष्वथ जगतीपतिर्जगतीमर्बुदान्येकादश**

**परिवत्सराणामव्याहताखिलपुरुषकारसारसम्भृतदोर्दण्डयुगलापीडित-**

**मौर्वीगुणस्तनितविरमितधर्मप्रतिपक्षो,**

**बर्हिष्मत्याश्चानुदिनमेधमानप्रमोदप्रसरणयौषिण्य-**

**व्रीडाप्रमुषितहासावलोकरुचिरक्ष्वेल्यादिभिः(फ्),**

**पराभूयमानविवेक इवानवबुध्यमान इव महामना बुभुजे ॥ 29॥**

अशाप्रकारे कवी इत्यादी तीन पुत्र निवृत्ती परायण झाल्यानंतर महात्म्या राजा प्रिय वृत्ताने 11 अर्बुदवर्षे पर्यंत पृथ्वीवर शासन केले .ज्या ज्या वेळी तो आपल्या अप्रतिबंध पराक्रम युक्त हातांनी धनुष्याची दोरी ओढून टणत्कार करी ,त्यावेळी भयभीत होऊन सर्व धर्मद्रोही लोक परागंधा होत .प्राणप्रिय बर्हिष्मतीच्या दिवसेंदिवस वाढणाऱ्या आनंददायी स्त्री सुलभ हावभाव ,लाजरे मंद हास्य व तकटाक्ष आणि मनोहर क्रीडा इत्यादींमुळे प्रिय व्रत जणू विवेकहीन 'आत्मविस्मृती झालेल्या माणसांप्रमाणे सर्व भोग भोगू लागला .

**यावदवभासयति सुरगिरिमनुपरिक्रामन् भगवानादित्यो**

**वसुधातलमर्धेनैव प्रतपत्यर्धेनावच्छादयति तदा हि,**

**भगवदुपासनोपचितातिपुरुषप्रभावस्तदनभिनन्दन्**

**समजवेन रथेन ज्योतिर्मयेन रजनीमपि, दिनं(ङ्) करिष्यामीति**

**सप्तकृत्वस्तरणिमनुपर्यक्रामद् द्वितीय इव पतङ्गः ॥ 30॥**

एकदा त्याने पाहिले की ,भगवान सूर्य सुमेरू पर्वताची प्रदक्षिणा करीत असता पृथ्वीचा अर्धा सभाग प्रकाशात राहतो आणि अर्ध्या भागात अंधार असतो ,तेव्हा त्याला हे आवडले नाही .तेव्हा भगवंतांच्या उपासनेमुळे अलौकिक प्रभावशाली अशा त्याने " मी रात्रीचा सुद्धा दिवस करीन " असे ठरवून सूर्याप्रमाणेच वेगवान व तेजस्वी रथात बसून 'दुसरा जणू सूर्यच अशा रीतीने सूर्याच्या पाठोपाठ पृथ्वीच्या सात प्रदक्षिणा केल्या.

**ये वा उ ह तद्रथचरणनेमिकृतपरिखातास्ते सप्त सिन्धव**

**आसन् यत एव कृताः(स्) सप्त भुवो द्वीपाः ॥ 31॥**

त्यावेळी त्याच्या रथाच्या चाकांनी जे खड्डे पडले ,तेच साथ समुद्र झाले .त्यांपासून सात द्वीपे बनली.

**जम्बूप्लक्षशाल्मलिकुशक्रौञ्चशाकपुष्करसं(ञ्)ज्ञास्तेषां(म्) परिमाणं(म्),**

**पूर्वस्मात्पूर्वस्मादुत्तर उत्तरो यथासङ्ख्यं(न्) द्विगुणमानेन बहिः(स्)**

**समन्तत उपक्लृप्ताः ॥ 32॥**

त्यांची क्रमशः नावे जंबू, प्लक्ष ,शाल्मली ,कुश , क्रौंच ,शाक आणि पुष्कर अशी आहेत .त्यामध्ये पहिल्यापेक्षा नंतरच्या द्वीपांचा विस्तार दुप्पट आहे आणि ही समुद्राच्या बाहेरच्या भागात पृथ्वीच्या चारी बाजूंना पसरलेली आहेत.

**क्षारोदेक्षुरसोदसुरोदघृतोदक्षीरोददधिमण्डोदशुद्धोदाः(स्)**

**सप्त जलधयः(स्) सप्त द्वीपपरिखा इवाभ्यन्तरद्वीपसमाना,**

**एकैकश्येन यथानुपूर्वं(म्) सप्तस्वपि बहिर्द्वीपेषु पृथक्परित**

**उपकल्पितास्तेषु जम्ब्वादिषु,**

**बर्हिष्मतीपतिरनुव्रतानात्मजानाग्नीध्रेध्मजिह्वयज्ञबाहुहिरण्यरेतोघृतपृष्ठ-**

**मेधातिथिवीतिहोत्रसं(ञ्)ज्ञान् यथासङ्ख्येन एकैकस्मिन्**

**एकमेवाधिपतिं(वँ) विदधे ॥ 33॥**

हे सात समुद्र क्रमशः खारेपाणी ,उसाचा रस 'मदिरा ,तूप ,द्रूध,ताक आणि गोड्या पाण्याने भरलेले आहेत .हे सातही समुद्र बेटांच्या खंडकांप्रमाणे आहेत आणि विस्ताराच्या बाबतीत आपल्या आतील द्विपांच्या बरोबरीचे आहेत .त्यांपैकी एकेका समुद्राने क्रमशः वेगवेगळ्या सात द्वीपाना बाहेरून वेढलेले आहे. बहिष्मतीपती महाराज प्रिय व्रता ने आपल्याला अनुकूल असलेले आपले पुत्र आग्नीध्र, इहमजिव्ह,यज्ञबाहू, हिरण्यरेता, घृतपुष्ठ, मेधा तिथी आणि वीतीहोत्र या एकेकांना क्रमशः वरील एकेका द्विपा चाराजा बनविले.

**दुहितरं(ञ्) चोर्जस्वतीं(न्) नामोशनसे प्रायच्छद्यस्यामासीद्**

**देवयानी नाम काव्यसुता ॥ 34॥**

त्याने आपली कन्या उर्जस्वती हिचा विवाह शुक्राचार्यांशी करून दिला. तिच्यापासून शुक्रकन्या देवयानीचा जन्म झाला.

**नैवं(वँ)विधः(फ्) पुरुषकार उरुक्रमस्य,**

**पुं(म्)सां(न्) तदङ्घ्रिरजसा जितषड्गुणानाम् ।**

**चित्रं(वँ) विदूरविगतः(स्) सकृदाददीत,**

**यन्नामधेयमधुना स जहाति बन्धम् ॥ 35॥**

राजन, ज्यांनी भगवच्चरणारविंदांच्या धुळीच्या प्रभावाने शरीराच्या तहानभूक , शोक मोह आणि म्हातारपण - मृत्यू या सहा विकारांना किंवा मनासहित सहा इंद्रियांना जिंकले आहे ' त्या भगवद्भक्तांचा असा पुरुषार्थ दिसणे ही काही आश्चर्याची गोष्ट नाही . कारण वर्णबहिष्कृतपुरुष सुद्धा भगवंतांच्या नावाचा फक्त एक वेळ उच्चार केल्याने तत्काल संसार बंधनातून मुक्त होतो.

**स एवमपरिमितबलपराक्रम एकदा तु**

**देवर्षिचरणानुशयनानुपतितगुणविसर्गसं(म्)सर्गेणानिर्वृतमिवात्मानं(म्)**

**मन्यमान आत्मनिर्वेद इदमाह ॥ 36॥**

अशाप्रकारे अतुलनीय बलपराक्रमाने युक्त असूनही महाराज प्रिय व्रत ,एकदा देवर्षी नारदांच्या चरणांना शरण जाऊ नाही पुन्हा दैव व शांत प्राप्त झालेल्या प्रपंचात गुंतल्याने कष्टी झाला आणि मनोमनविरक्त होऊन म्हणू लागला.

**अहो असाध्वनुष्ठितं(यँ) यदभिनिवेशितोऽहमिन्द्रियैरविद्यारचितविषमविषयान्धकूपे,**

**तद् अलम् अलम् अमुष्या वनिताया**

**विनोदमृगं(म्) मां(न्) धिग्धिगिति गर्हयाञ्चकार ॥ 37॥**

अरेरे !फार वाईट झाले ,माझ्या इंद्रियांनी मला या अविद्या जनहित आयुष्यमान विषय रूप अंधाऱ्या विहिरीत ढकलले आहे .बस !पुरे झाले हे !मी तर पत्नीच्या हातातील खेळणी बनलो आहे .माझा धिक्कार असो !असे म्हणून त्याने स्वतःलाच दोष दिला.

**परदेवताप्रसादाधिगतात्मप्रत्यवमर्शेनानुप्रवृत्तेभ्यः(फ्) पुत्रेभ्य**

**इमां(यँ) यथादायं(वँ), विभज्य भुक्तभोगां(ञ्) च महिषीं(म्) मृतकमिव**

**सह महाविभूतिमपहाय स्वयं(न्) निहितनिर्वेदो, हृदि गृहीतहरिविहारानुभावो**
**भगवतो नारदस्य पदवीं(म्) पुनरेवानुससार ॥ 38॥**

परमआज्ञार्थ श्रीहरींच्या कृपेने त्याची विवेकशक्ती जागृत झाली. त्याने ही पृथ्वी आपल्याला अनुकूल असणाऱ्या पुत्रांना वाटून दिली आणि ज्यांच्याबरोबर त्यांनी निरनिराळे भोग भोगले होते, त्या आपल्या राणीला साम्राज्यलक्ष्मीसह मृतदेहाप्रमाणे सोडून दिले आणि हृदयात वैराग्य धारण करून भगवंताच्या लीलांचे चिंतन करीत, त्या प्रभावाने श्रीनारदांनी सांगितलेल्या उपदेशाप्रमाणे पुन्हा मार्गक्रमण सुरू केले. (३८)

**तस्य ह वा एते श्लोकाः-**

**प्रियव्रतकृतं(ङ्) कर्म, को नु कुर्याद्विनेश्वरम् ।**

**यो नेमिनिम्नैरकरोच्-छायां(ङ्) घ्नन् सप्तवारिधीन् ॥ 39॥**

प्रियव्रताविषयी खालील लोकोक्ती प्रसिद्ध आहे—"राजा प्रियव्रताने जी कर्मे केली, ती सर्व शक्तिमान ईश्वराशिवाय दुसरा कोण करू शकेल? त्याने रात्रीचा अंधार नाहीसा करण्याचा प्रयत्न करीत आपल्या रथाच्या चाकांनी बनलेल्या खड्ड्यांपासून सात समुद्र बनविले." (३९)

**भूसं(म्)स्थानं(ङ्) कृतं(यँ) येन, सरिद्गिरिवनादिभिः ।**

**सीमा च भूतनिर्वृत्यै, द्वीपे द्वीपे विभागशः ॥ 40॥**

प्राण्यांच्या सोयीसाठी द्वीपांच्या द्वारा पृथ्वीचे विभाग केले आणि प्रत्येक द्वीपामध्ये वेगवेगळ्या नद्या, पर्वत आणि वन इत्यादींनी त्यांच्या सीमा निश्चित केल्या. (४०)

**भौमं(न्) दिव्यं(म्) मानुषं(ञ्) च, महित्वं(ङ्) कर्मयोगजम् ।**

**यश्चक्रे निरयौपम्यं(म्), पुरुषानुजनप्रियः ॥ 41॥**

तो भगवद्भक्तांचा भक्त होता. त्याने पाताळलोक, देवलोक, मृत्युलोक तसेच कर्म आणि योगशक्तीने प्राप्त झालेले ऐश्वर्य नरकासमान मानले. (४१)

**इति श्रीमद्भागवते महापुराणे पारमहं(म्)स्यां(म्)**

**सं(म्)हितायां(म्) पञ्चमस्कन्धे प्रियव्रतविजये प्रथमोऽध्यायः ॥**

**ॐ पूर्णमदः(फ्) पूर्णमिदं(म्)पूर्णात्पूर्णमुदच्यते**

**पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ॥**

**ॐ शान्तिः(श्)शान्तिः(श्)शान्तिः ॥**